विषय: कोविड-१९ या पार्श्वभूमीवर
कार्यालयामध्ये कार्यालयाच्या
कामाबाबत.

**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, फाऊंटन, बिएसएनएल-एमटीएनएल इमारत क्र.२,**
**महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**क्र.पओका/ संगणक/करोना/२०२०/ जा.क्र. 4515 दि.** 16 JUN 2020

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.पआका/संगणक/कोरोना/२०२०/जा.क्र. ४२९७, दि. २६.०५.२०२०.

## कार्यालयीन आदेश

राज्यामध्ये करोना महामारीच्या प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासनातर्फे आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून ,यापुर्वीच परिवहन आयुक्त कार्यालयाने दि. २६/०५/२०२० रोजीच्या आदेशान्वये निर्देश जारी केले आहे. राज्य शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशास अनुसरुन आता निर्देश देण्यात येते की, राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या शिबिर कार्यालयामधील कामे वगळता उर्वरित सर्व कामे जसे- अनुज्ञप्ती जारी करणे, अनुज्ञप्ती दुय्यम करणे अनुज्ञप्ती विषयक सर्व कामे इ, वाहन नोंदणी, वाहन हस्तांतरण, वाहन विषयक सर्व कामे, परवाना विषयक सर्व कामे, वायुवेग पथक इ. कामकाज सूरु करण्यात यावे .

अनुज्ञप्ती व वाहन विषयक कामांकरिता आगाऊ वेळ निर्धारण प्रणाली (अपॉईन्टमेंट) सुरू करणे बाबत निर्देश दिल्यानुसार कार्यालयातील उपलब्ध कर्मचारी / अधिकारी यांच्या संख्येनुसार प्रत्येक कामाकरिता कोटा निश्चित करण्यात यावे. शिकाऊ अनुज्ञप्तीची संगणकीय चाचणी घेताना खालील प्रमाणे दक्षता घेण्यात यावी.

- २ अर्जदारांमध्ये किमान ६ फुटाचे अंतर असावे.
- एका अर्जदाराची चाचणी झाल्यास संगणक/ की-बोर्ड सॅनिटाईज करुन घेण्यात यावे.
- अर्जदारास मास्क व हँडग्लोज घालुनच कार्यालयात प्रवेश देण्यात यावा.
- कार्यालयामध्ये सॅनिटायझर पुरेशा प्रमाणात साठा करुन ठेवण्यात यावे.

लॉकडाऊन कालावधी पर्यंत शिकाऊ अनुज्ञप्ती जारी केलेल्या व मधल्या काळात ज्यांची वैधता संपली आहे अशा शिकाऊ अनुज्ञप्तींची वैधता दिनांक ३०.०९.२०२० पर्यंत वाढविण्यात आली असल्यामुळे अशा अनुज्ञप्ती धारकांची पक्क्या अनुज्ञप्तीचे कामे प्राधान्याने करण्यात यावीत. पक्की अनुज्ञप्तीची चाचणी घेण्याआधी वाहन सॅनिटाईज केल्याची खातरजमा करण्यात यावी. त्याचप्रमाणे पक्की अनुज्ञप्तीची चाचणी

Scanned with CamScanner

मोटार ड्रायव्हिंग स्कुलच्या वाहनावर घेतल्यास एका उमेदवाराची चाचणी झाल्यानंतर वाहन सॅनिटाईज करुन घेतल्यानंतरच दुसऱ्या उमेदवाराची चाचणी घेण्यात यावी. ज्या अर्जदारांनी सहा. मोटार वाहन पदाच्या परिक्षेकरिता अर्ज भरले असल्यास अशा अर्जदारांची शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीचे काम प्राधान्याने करण्यात यावे व अशा प्रकरणी गरज भासल्यास व्हीआयपी कोटयाच्या ( पीकप कॅन्डीडेट ) या सुविधेचा वापर करण्यात यावा.

योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यासाठी आलेल्या वाहनांचे सॅनिटायझेशन केल्यानंतरच अशा वाहनांची चाचणी घेण्यात यावी.

वरिल सुचनांची यादी कार्यालयीन फलकावर, विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावी व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात यावी. उपरोक्तनुसार कार्यालयातील कामे सुरु केल्याबाबत आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास अवगत करावे. कोरोना महामारीचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता, कार्यालयामधील गर्दी कमी ठेवण्याबाबत शासनातर्फे व या कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे.

**शेखर चन्ने**
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत-** मा.अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरिता सादर.

Scanned with CamScanner